पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०२

**सभावृत्तांत**

दिनांक - **२६/०६/२०१९** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **२६/०६/२०१९** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव - सभापती**
२. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
३. मा.सुनिता हेमंत तापकीर
४. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे

या शिवाय मा.इंदलकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.भोसले, मा.पोरेड्डी – कार्यकारी अभियंता, मा.खडतरे – उप अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) सभा आयोजनाबाबत.– मा.कैलास बारणे, मा.लक्ष्मणशेठ सस्ते याचा प्रस्ताव.

----------

दिनांक १४/०६/२०१९ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्र.१ ) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २६/०६/२०१९
सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.लक्ष्मणशेठ सस्ते
संदर्भ : मा.कैलास बारणे, मा.लक्ष्मणशेठ सस्ते यांचा प्रस्ताव –

मा.शहर सुधारणा समितीची प्रत्येक महिन्याचे दुस-या व चौथ्या बुधवारी (दुपारी ३.०० वा.) आयोजित करणेत येणारी पाक्षिक सभा महिन्याचे दुस-या व चौथ्या बुधवारी दुपारी १२.३० वा.आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **राजेंद्र किसनराव लांडगे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२९९/२०१९
दिनांक : २९/०६/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.